REGISTERED No. B. 3434




# अर्थ

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख १० आगस्ट, १९४९ | अंक ३२

## धी कोपरगांव पीपल्स को. ऑ. बँक लि.

**कोपरगांव, जि. अहमदनगर.**

( उद्घाटन समारंभ : ता. १७-१-१९४९ )

कोपरगांव येथील अत्यंत प्रतिष्ठित नागरिक यांचे देखरेखीखालीं स्थापित झालेली आणि आधुनिक पद्धतीवर बँकिंगचे सर्व व्यवहार करणारी

**स्थानिक सहकारी बँक**

**सुरुवातीचें शेअर भांडवल : ६८,७५० रु.**

बिलें वसुली, हुंड्या, मुंबईवरील चेक्स, ड्राफ्टस, वगैरे व्यवहार केले जातात.

आकर्षक व्याजावर मुदतीच्या ठेवी ३ महिनेपासून ५ वर्षे-पर्यंत स्वीकारल्या जातील.

सेव्हिंग्ज बँकेंत रु. १०,००० पर्यंत व्याज देण्यांत येतें.

**विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.**

जी. पी. ठाणेकर बी. ए. मॅनेजर. | मोहनलाल कालिदास व्यास चेअरमन.

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखाः—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. २१-१२-४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठेवी | रु. | ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९,००,००० |

**मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :**

| १ वर्ष | दोन वर्ष | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. | वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

**( शिडयूल्ड बँक )**

**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग पुणें २.**

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१५,१६५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७१,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर. | श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

**सर्व प्रसिद्ध माल**

औंध सोप फॅक्टरीचे कपड्याचे व अंगाला लावण्याचे साबण, फ्लेक्स, व शेव्हिंग स्टिक्स वगैरे निरनिराळे प्रकार.

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें २ | केळकर बंधू, (शाखा) मेन रोड, नाशिक.

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


## विविध माहिती

**मध्यवर्ती सरकारचे कर्जबाजारी नौकर**—हिंद सरकारच्या मध्यम वर्गीय कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीसंबंधीं नुकताच एक आढावा घेण्यांत आला. ह्या आढाव्यांत असें आढळून आलें कीं, दिल्लीमधील नौकरवर्गीतील जवळ जवळ ४० टक्के आणि कलकत्त्यामधील जवळ जवळ ७५ टक्के नौकर कर्जबाजारी झालेले आहेत. कर्जाच्या कारणांत विवाह आणि कुटुंबांतील माणसांचे आजार, हीं दोन कारणें प्रमुख दिसून येतात. कुटुंबांची मिळकत आणि खर्च ह्यांच्यांतहि फार तफावत दिसून आली. मद्रास व दिल्ली प्रांतांतील नौकरांच्या जमाखर्चांत त्यांतल्यात्यांत कमी तफावत दिसून आली.

**सुपरफॉस्फेट्स खताची किंमत**—हिंदुस्थानांत तयार झालेलें सुपरफॉस्फेट्सचें खत संस्थानांना आणि प्रांतांना टनाला २२७ रु. ह्या दरानें देण्याचें मध्यवर्ती सरकारच्या शेतकी खात्यानें ठरविलें आहे. ह्या खताचा उपयोग जमिनीचा कस राखण्यासाठीं आणि पिकांची वाढ होण्यासाठीं केला जातो. हिंदुस्थानांतील कांहीं भूप्रदेशांतील जमिनींत सुपरफॉस्फेट्स निसर्गतःच कमी आहेत. त्रावणकोर, म्हैसूर, मद्रास, हैद्राबाद, मुंबई, इत्यादी ठिकाणीं वरील खत तयार करण्याचे कारखाने आहेत. ह्या सर्व कारखान्यांत तयार होणारें खत मध्यवर्ती सरकार आपल्या ताब्यांत घेतें आणि निरनिराळ्या प्रांतांच्या गरजांप्रमाणें त्यांना ठराविक किंमत घेऊन वांटून देतें.

**ओरिएंटल विमा कंपनी**—ओरिएंटल विमा कंपनीनें १९४८ सालीं १८३ कोटी रुपयांचें काम पुरें केलें. १९४७ सालीं तिनें ३० कोटी रुपयांचें काम पुरें केलें होतें. कंपनीकडे मृत्यूमुळें द्यावयाच्या जेवढ्या क्लेम्सची तरतूद केलेली आहे, तिचे मानानें ६४·८% क्लेम्स १९४८ सालीं आले. खर्चाचें प्रमाण २३·१% पडलें. रोख्यांच्या किंमतींतील उतारामुळें, कंपनीच्या पुस्तकांतील रोख्यांची किंमत बाजारभावापेक्षा ५४६ लक्ष रुपयांनीं कमी होती, ती आतां ४२५ लक्ष रुपयांनीं कमी झाली आहे.

**अमेरिकन मक्तेदार कंपन्यांचें आक्रमण**—सो. रशिआच्या नाविक दलाचे मुखपत्र 'रेड फ्लीट' ह्यानें अमेरिकन मक्तेदार कंपन्यांविषयीं अशी माहिती दिली आहे कीं, त्या कंपन्या मलाया, ब्रह्मदेश, सयाम आणि इंडोनेशिआ ह्या भागांतील ब्रिटिश व्यापारी हितसंबंधांत आपला शिरकाव करून घेत आहेत. हें पत्र पुढें म्हणतें कीं, ब्रिटनच्या युद्धोत्तर अडचणींचा फायदा घेऊन पौंडाच्या कक्षेंतील देशांवर अमेरिकन व्यापार आक्रमण करीत आहे. इंडोनेशिआंतील रबर, टिन आणि तेल ह्या वस्तूंच्या उत्पादनावरही अमेरिकन कंपन्या आपलें वर्चस्व स्थापूं पहात आहेत.

**पश्चिम नेपाळांत खनिज संपत्तीचा ठेवा**—नेपाळची राजधानी खाटमांडू येथून १०० मैल पश्चिमेस लोखंड आणि इतर खनिजांचे विपुल सांठे आहेत, असें कांहीं परदेशीय भूस्तरशास्त्रज्ञांना आढळून आलें आहे.

**पूर्व आफ्रिकेंतील हिंदी रहिवासी**—पूर्व आफ्रिकेंतील केनिआ, टांगानिका आणि युगांडा ह्या ब्रिटिश वसाहतींत मिळून गेल्या वर्षी १,६७,३६२ हिंदी नागरिक होते, अशी माहिती प्रसिद्ध झाली आहे.

**बँक ऑफ बरोडाचें भवितव्य**—बडोदें सरकार व बँक ऑफ बरोडा ह्यांचे मधील कराराप्रमाणें केलेल्या कांहीं व्यवस्था चालू ठेवण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. उदाहरणार्थ, सरकारच्या कांहीं रकमा बडोदा बँकेंत ठेवल्या जातील. प्रस्तुत कराराची मुदत ३१ डिसेंबर, १९५३ अखेर आहे.

**बाहेरून साखर आणण्यास परवानगी द्या**—गेल्या महिन्यांत साखरेची किंमत बरीच वाढली आहे. एक लक्ष टन विदेशी साखर मागविण्यास सरकारनें परवानगी द्यावी, अशी बाँबे शुगर मर्चंटस् असोसिएशनच्या अध्यक्षांनीं सूचना केली आहे.

**११ प्रयोग शाळांसाठी ३$\frac{3}{4}$ कोटी रुपये**—हिंदुस्थानांत ११ मोठ्या प्रयोगशाळा स्थापन केल्या जाणार आहेत, त्या उभारण्यास ३ कोटी, ८० लक्ष रु. खर्च येणार आहे.

**श्री. पारखे ह्यांची नेमणूक**—पोष्ट, तार व टेलिफोन खात्याचे संबंधांत सरकारला सल्ला देण्यासाठी वेगवेगळ्या विभागांसाठी सल्लागार मंडळें स्थापन होत आहेत. मुंबई विभागासाठी स्थापन करण्यांत आलेल्या मंडळावर पुण्याचे, पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स लि. चे मॅनेजिंग एजंट श्री. म. स. पारखे ह्यांची नेमणूक झाली आहे.

**रिझर्व्ह बँकेनें काढलेल्या नोटांत घट**—२९ जून, १९४९ अखेर संपलेल्या आठवड्याचें रिझर्व्ह बँकेचें पत्रक पाहिलें, तर तिनें काढलेल्या चलनी नोटांत १४·३७ कोटी रुपयांची घट झालेली आढळते. खेळत्या नोटा ११·११ कोटी रुपयांनीं कमी झाल्या आहेत. बँकिंग खात्यांतील नोटाहि ३·२५ कोटी रुपयांनीं कमी आहेत. इश्यू खात्याच्या जिंदगी बाजूंतहि स्वाभाविकच त्याप्रमाणें कांहीं बदल झालेला आहे. परदेशी रोखे १५ कोटी रुपयांनीं कमी झाले आहेत. ६५ रोख लक्ष रुपये वाढले आहेत.


**कॉमनवेल्थ विमा कंपनी लिमिटेड, पुणें.**

*१० व्या अहवालांतील कांहीं उद्बोधक आंकडे*

| | |
|---|---|
| अेकूण जिंदगी | रु. १,०१,०१,७९२-१०-८ |
| आयुर्विमा निधी | रु. ८६,२२,५४७-१०-१ |
| आयुर्विमा हप्त्यांचें उत्पन्न | रु. १४,८२,११७-१३-३ |
| अल्पावधींतील आग विम्याचें उत्पन्न | रु. १७,८७६- ४-० |
| रीन्युअल अेक्सपेन्स रेशिओ | शें. १३·९१ |

शाखा— मुंबई, अहमदाबाद, अजमीर, नागपूर, दिल्ली, कलकत्ता, बंगलोर, टेनाली, हैद्राबाद (दक्षिण).

आयुष्य व आग विमा अेजन्सी भरपूर कमिशनवर देणें आहेत.

*माहितीकरितां भेटा अगर लिहा.* श्री. म. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. १० आगस्ट १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## हिंदुस्थानाचा आर्थिक आढावा

### एप्रिल–जून तिमाहींत प्रगति झाली काय?

मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें ह्यांचा खर्च त्यांच्या चालू उत्पन्नाच्यापेक्षा बराच ज्यास्त होत आहे आणि हिंदुस्थानाची पौंडी गंगाजळींतील शिल्लक कमी कमी होत चालली आहे. एके काळीं (फार दिवसापूर्वी नव्हे) ही गंगाजळी म्हणजे भांडवली साहित्याच्या पुरवठ्यासाठी उपयोगांत आणावयाचा फंड, अशीच योग्य समजूत होती. परदेशी मालाची मुक्तद्वार आयात झाली त्यामुळें चलनवाढीच्या प्रवृत्तीस थोडा आळा बसला. तथापि, फार थोड्या अवधींत अतिशय मोठी प्रगति करण्याचा हिंदुस्थानाचा प्रयत्न असून त्या मानानें कष्ट किंवा त्याग मात्र होत नाहीं, असें दिसतें. औद्योगिक उत्पादन हें वाढीच्या मार्गास लागलें असलें तरी किंमती उतरण्याची प्रवृत्ति अद्याप आढळून येत नाहीं. सध्याच्या भारी किंमतीमुळें निर्गत वाढूं शकत नाहीं. त्यामुळें, हुंडणावळीची गंगाजळी आणखी कमी होत आहे. रिझर्व्ह बँकेकडील सरकारच्या ठेवीहि फार मोठ्या प्रमाणांत कमी झाल्या आहेत. १९४९ च्या दुसऱ्या तिमाहींतील अर्थव्यवहारांचा वरीलप्रमाणें आढावा "टाटा कार्टर्ली"नें आपल्या ताज्या अंकांत घेतला आहे.

एप्रिल–जूनच्या तिमाहींत घाऊक किंमतींत थोडीशी वाढच झाली. घाऊक किंमतींचा इंडेक्स नंबर मार्च अखेर १४ नें कमी होऊन ३७० वर आला होता, तो एप्रिलमध्यें ३७६ पर्यंत चढून त्याचे आसपास टिकून राहिला. अन्नाच्या किंमतींत जानेवारी-मार्चमध्यें उतार झाला होता, परंतु एप्रिल-जूनमध्यें त्यांत वाढच झालेली आहे आणि आताच्या अन्नाच्या किंमती एका वर्षापूर्वीच्या मानानें ज्यास्तच आहेत. औद्योगिक कच्चा माल महागलेला नाहीं, परंतु तयार मालाची किंमत मात्र वाढलेली आहे.

घाऊक किंमती

( ऑगस्ट १९३९ अखेरचें वर्ष=१०० )

| | अन्न | औद्योगिक कच्चा माल | पक्का माल | सर्व प्रकारचा माल |
|---|---|---|---|---|
| जाने. १९४९ | ३८५ | ४५६ | ३३९ | ३७६ |
| फेब्रु. | ३८३ | ४५७ | ३३० | ३७२ |
| मार्च | ३७६ | ४६२ | ३२९ | ३७० |
| एप्रिल | ३७३ | ४६२ | ३४७ | ३७६ |
| मे | ३७७ | ४६३ | ३४७ | ३७७ |
| जून | ३८१ | ४६० | ३४९ | ३७८ |

शहरी रहाणीच्या खर्चाचें मान वाढलेंहि नाहीं व उतरलेंहि नाहीं; तें साधारण एकाच पातळीवर कायम राहिलें. एका वर्षापूर्वीशी तुलना केली, तर तेव्हांचे मानानें आतां रहाणीचें मान किंचित् अधिक आहे, असें दिसून येतें. औद्योगिक उत्पादनाचा विचार करतां, त्याची प्रवृत्ति समाधानकारक आढळते. कोळसा व सिमेंट ह्यांचें उत्पादन चांगलेंच सुधारलें आहे आणि तागाच्या मालाचें उत्पादनहि वाढलें आहे. गिरण्यांतील विजेच्या खपाचा १९४९ च्या पहिल्या तिमाहींतील आकडा त्या पूर्वीच्या तिमाहीपेक्षां लहान असला तरी १९४८ च्या पहिल्या तिमाहीपेक्षां तो मोठाच आहे. पोलादाचें उत्पादन १९४७ च्या मध्यापासून असमाधानकारक होतें, तें १९४९ च्या पहिल्या तिमाहींत वाढलेलें दिसतें. मुंबई प्रांतांतील कापडाचें उत्पादन मात्र बरेंच घटलेलें आहे. रेल्वे वहातुक समाधानकारक आहे. एका वर्षापूर्वीच्या मानानें, वॅगन्स भरण्याचें प्रमाण १६% अधिक असून त्यांतून वाहिलेल्या मालाचें वजन २२% ज्यास्त होत आहे.

हिंदुस्थानाच्या परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति असमाधानकारकच आहे. १९४९ च्या पहिल्या तिमाहींत, दरमहा सुमारें २० कोटी रुपयांची हिंदी आयात–निर्गतींत प्रतिकूल तफावत पडत असे. एप्रिलमध्यें, ह्या तफावतीचा आकडा कमी (१६ कोटी रु.) झाला, परंतु लागलीच पुढच्या महिन्यांत तो ३३ कोटी रुपयांवर गेला. निर्गतीच्या बाबी पाहिल्या, तर त्यांत विशेष सुधारणा नाहींच. परंतु, आयातींत अन्नधान्य व कपास ह्यांचेंत मात्र वाढ झाली आहे. यंत्रसामुग्री, पेट्रोल, वहानें, इत्यादींच्या आयातीमुळेंहि आयातीच्या किंमतींत वाढ दिसून येते.

परराष्ट्रीय व्यापार

( लक्ष रु. )

| | हिंदी मालाची निर्गत | आयात (एकूण आयातींतून पुनर्निर्गत वजा करून) | वाढावा अथवा घट |
|---|---|---|---|
| जून १९४८ | ३५,९९ | ३४,९३ | + १,०६ |
| जुलै | ३८,२९ | ४०,०५ | − १,७६ |
| ऑगस्ट | ३३,२३ | ४३,३० | −१०,०७ |
| सप्टेंबर | ३४,८० | ३८,८९ | − ४,०९ |
| ऑक्टो. | ३२,२५ | ३४,८७ | − २,६२ |
| नोव्हें. | ३६,४६ | ४५,६२ | − ५,१६ |
| डिसेंबर | ३४,७८ | ४५,५३ | −१०,७५ |
| जानेवारी १९४९ | ३४,६३ | ५४,५३ | −१९,९० |
| फेब्रु. | ३५,३२ | ५१,६८ | −१६,३६ |
| मार्च | ३१,९४ | ५४,७९ | −२२,८५ |
| एप्रिल | ३१,९० | ४८,४२ | −१६,५२ |
| मे | २७,९२ | ६०,८४ | −३२,९२ |

चलनी नोटांच्या प्रसारांत मार्च, १९४९ चे मानानें जून १९४९ अखेर ३ कोटींची घट दिसून येत आहे. मेच्या मध्यापर्यंत चलनविस्तार चालू होता, परंतु जूनच्या शेवटच्या आठवड्यांत एकदम त्याचें संकोचन झालें. मेच्या मध्यापर्यंत सरकार व व्यापारी ह्यांनीं परराष्ट्रीय हुंडणावळीची मोठी खरेदी केली तरी त्यापेक्षा ज्यास्त प्रमाणांत सरकारनें आपल्या रिझर्व्ह बँकेकडील ठेवी वापरल्या व त्यामुळें त्यांत पुष्कळच घट झाली आणि अंतर्गत मागणीमुळें चलनवृद्धी झाली. पुढें, सरकारी ठेवी कमी होत गेल्या तरी पैशाची अंतर्गत मागणीहि कमी होऊन चलनविस्तारास आळा बसला. रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्यांतील

स्टर्लिंग रोखे ४६ कोटींनीं कमी झाले त्या प्रमाणांत हिंदी रोखे वाढले. ह्याचा अर्थ, चालू खर्च भागविण्यासाठीं स्टर्लिंग रोख्यांचा उपयोग करण्यांत आला. बँकिंग खात्यांतील परदेशांतील ठेवी ७० कोटींनीं कमी झाल्या. म्हणजे, ४६ + ७० = ११६ कोटी रुपयांनीं परदेशी हुंडणावळीची गंगाजळी घटली. जानेवारी–मार्च ह्या तिमाहींत ५४ कोटी रुपयांनींच घट झाली होती. जून, १९४८ अखेर परदेशी हुंडणावळीचे पोटीं ८२८ कोटी रुपये शिल्लक आहेत. ज्या गतीनें हिंदुस्थान त्यांचा फडशा पाडीत आहे; ती गती कायम राहिल्यास ही रक्कम फार काळ पुरी पडणार नाहीं. मार्च, १९४९ अखेर हिंदुस्थान सरकारचे रिझर्व्ह बँकेमध्यें १८४ कोटी रु. शिल्लक होते, ते जून, १९४९ अखेर ५९ कोटी रुपयेच राहिले. सरकारचा भांडवली खर्चाचा मोठा कार्यक्रम बहुंशीं ह्याच्या बुडाशीं आहे. सरकारनें आपला खर्च हिंदुस्थानांत पैसे उभारूनच व परदेशांतील खर्च कमींत कमी राखूनच भागवून काटकसरीनें कारभार करणें अत्यावश्यक आहे.

---

## सोडा ॲश तयार करण्याचा धंदा

हिंदुस्थानांतील सोडा ॲश निर्माण करणाऱ्या कारखान्यांना सरकारी मदतीची अगर संरक्षणात्मक जकातीची कितपत आवश्यकता आहे ह्यासंबंधीं टॅरीफ बोर्डानें नुकतीच चौकशी केली. ज्या धंद्यांत तयार होणारा माल इतर धंद्यांना कच्चा माल म्हणून वापरावा लागतो, अशा धंद्यांना संरक्षण अगर मदत देतांना फक्त त्याच धंद्यांचा विचार करून भागत नाहीं. कच्च्या मालाचा पुरवठा स्वस्ताईनें होणें जरूर असतें, त्याचबरोबर असा माल उत्पन्न करणारे देशी धंदे आपल्या मालाचा पुरवठा निश्चितपणें करतील अशीही खात्री करून घेणें आवश्यक असते. हिंदुस्थानांत आज सोडा ॲश तयार करणारे दोन कारखाने आहेत. एक मिठापूर येथील टाटा केमिकल्स हा आणि दुसरा ध्रांगध्रा केमिकल वर्क्स. हे दोन्ही कारखाने युद्धकाळीं व नंतरही चालू होते. परंतु कांहीं महिन्यांपूर्वीपासून ते बंद झाले आहेत. परदेशांतून आलेल्या स्वस्त दराच्या सोडा ॲशमुळें ह्या कारखान्यांचे सांठे पडून राहिले. देशांतील सोडा ॲशच्या खपाचें प्रमाण त्या त्या देशांतील आद्योगिक विकास दाखवितें, असें म्हणतात. हिंदुस्थानांतील दर माणशीं सोडा ॲशच्या खपाचें प्रमाण अवघें ६ पौंड आहे. अमेरिकेंत तें ५६ पौंड आहे. ह्यावरून येथील सोडा ॲशचा खप किती मागासलेला आहे हें दिसून येतें. हिंदमधील कांच कारखाने, सोडा ॲशच्या एकूण खपापैकीं एक चतुर्थांश सोडा ॲश वापरतात. येत्या दोन अगर तीन वर्षांत हिंदुस्थानला ९०,००० टन सोडा ॲश लागेल असा अंदाज आहे. सध्याचे दोन कारखाने जास्तींत जास्त ४५,००० टन सोडा ॲश निर्माण करूं शकतील. तथापि १९४८मध्यें फक्त २९,००० टनच सोडा ॲश निर्माण होऊं शकला. अशा परिस्थितींत सोडा ॲशची विभागणी योग्य रीतीनें होणें आवश्यक आहे. हिंदमध्यें तयार होणाऱ्या आणि परदेशांतून आयात होणाऱ्या सोडा ॲशचा एक संचय करून त्याची वांटणी योग्य किंमत ठेवून करणें, देशांतील सोडा ॲशच्या उत्पादनाची किंमत कमी करणें आणि कांच अगर बायक्रोमेटस् तयार करणाऱ्या कारखान्यांच्या उत्पादनाचा खर्च वाढूं न देणें, इत्यादी बाबी लक्षांत घेऊन ह्या धंद्याला संरक्षण देण्यांत यावें, अशी शिफारस करण्यांत आली आहे.

---

**हिंदी फळांची निर्गत**—हिंदी फळांची ग्रेट ब्रिटनकडे निर्गत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, असें समजतें.

## टाटा आयर्न ॲंड स्टील कंपनी लि.

### १,५०,९३,२५२ रु. निव्वळ नफा

टाटा स्टील कंपनीस, ३१ मार्च, १९४९ अखेर संपलेल्या वर्षीं गेल्या वर्षापेक्षा थोडा ज्यास्त नफा झाला. त्याचें कारण, अहवालाचे वर्षीं जेवढें उत्पादन झालें त्यापेक्षा ३२,००० टन ज्यास्त माल शिलकी स्टॉकमधून बाहेर जाऊं शकला. १ कोटी ५५ लक्ष रुपये कर, २७,९४,९८२ रुपये मॅनेजिंग एजन्सी कमिशन, १ कोटी ३५ लक्ष रुपये घसारा, ४१,६२,३२६ रु. कामगारांना बोनस ह्याप्रमाणें तरतूद करून निव्वळ नफा १,५०,९३,२५२ रु. उरला.

### नफ्याचा विनियोग

वरील नफ्यांत गेल्या वर्षअखेरचा शिलकी नफा २१,३५,५५४ रु. व १९४७–४८ च्या प्रेफरन्स शेअर्सच्या डिव्हिडंडवरील वसूल केलेला इनकम टॅक्स १७,६६,७६३ रु. मिळवला, म्हणजे नफा वांटणीस १,८९,९५,५६९ रु. येतात. त्यांतून ३५,५७,३६५ रु. चा रिझर्व्ह फंड काढला व १,५०,००,००० रु. चा डिव्हिडंड रिझर्व्हकडे विनियोग केला म्हणजे उरलेले ४,३८,२०४ रु. पुढील हिशेबांत ओढण्यांत येतील.

डिव्हिडंड रिझर्व्हमधून खालीलप्रमाणें डिव्हिडंड यावें, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे:—

| शेअरचा प्रकार | डिव्हिडंडचा दर | डिव्हिडंडची रक्कम. |
|---|---|---|
| पहिला प्रे. | प्रत्येकीं ९ रु. | ४,५०,००० रु. |
| दुसरा प्रे. | प्रत्येकीं ७ रु ८आ. | ५२,०३,६४२ रु. |
| ऑर्डिनरी | प्रत्येकीं १४ रु. | ४९,००,००० रु. |
| डिफर्ड | प्रत्येकीं ६४ रु. १५ आ. | ३१,६५,६२५ रु. |
| | | १,३७,१९,२६७ रु. |

कंपनीच्या उत्पन्नापैकी ३२·२०% रक्कम कामगारांच्या वांट्यास आली. युद्धापूर्वीं ती १९·०४% एवढीच असे. कच्च्या मालास २३·५३% रक्कम लागली, उत्पन्नापैकी २·१४% रक्कम रिझर्व्हकडे गेली; गेल्या वर्षीं ती ०·९४% होती तर १९३९–४० मध्यें ती ६·६६% होती. डिव्हिडंडच्या वांट्यास १९३९–४० मध्यें १५·२३% रक्कम आली होती ती आतां फक्त ४·८४% येत आहे.

---

## ब्रिटिश मालाची हिंदुस्थानांत आयात वाढली

मे, १९४९ अखेरच्या पांच महिन्यांत ग्रेटब्रिटनकडून हिंदुस्थानानें ५ कोटी, ९९ लक्ष पौंड किंमतीचा माल घेतला. १९४८ च्या पहिल्या पांच महिन्यांतील आयात ३ कोटी, १३ लक्ष पौंड किंमतीची होती. म्हणजे, ही आयत पुष्कळच वाढली आहे.

आयातीमधील प्रमुख बाबी खालीलप्रमाणें आहेत:—

| | |
|---|---|
| यंत्रसामुग्री ... ... | १ कोटी, ७५ लक्ष पौंड |
| वहातुकीचीं साधनें (बोटी, विमानें, इंजनें इ. सुद्धा) ... | ७६ लक्ष पौंड |
| वीज साहित्य ... ... ... | ४८ लक्ष पौंड |
| रसायनें, औषधें, रंग ... ... | ६१ लक्ष पौंड |

## हिंदी मालाची ब्रिटनमध्यें आयात कमी झाली

मे, १९४९ अखेर संपलेल्या पांच महिन्यांत ग्रेटब्रिटननें ३ कोटी, ९८ लक्ष पौंड किंमतीचा माल घेतला. १९४८ च्या पहिल्या पांच महिन्यांचा तत्सम आकडा ४ कोटी, २० लक्ष पौंड होता. ह्यामध्यें चहाची किंमत १९४८ च्या पहिल्या पांच महिन्यांत १ कोटी ४० लक्ष पौंड होती, ती १९४९ च्या पहिल्या पांच महिन्यांत १ कोटी, ७७ लक्ष पौंड भरली.

## हिंद मासिकाचा लघुकथा–स्पर्धा–विशेषांक

[ हिंद मासिक–संपादक, मुद्रक व प्रकाशक : श्री. न. मो. जोशी, एम्. ए.; वार्षिक वर्गणी रु. ६. विशेषांकाची किंमत १ रु.; पत्ता–हिंद मुद्रणालय, आंग्रेवाडी, मुंबई नं. ४ ]

'हिंद' मासिकाचा चालू ऑगष्ट १९४९ चा अंक हा खास लघुकथा–स्पर्धा–विशेषांक म्हणून प्रसिद्ध करण्यांत आलेला आहे. हिंद हें मासिक गेलीं चार वर्षें सुव्यवस्थितपणें चालविण्यांत येत आहे. काव्य–शास्त्र–विनोदयुक्त सात्त्विक करमणूक व आनंद घरबसल्या देणारीं त्याचसारखीं अल्पमोलीं साधनें फारशीं उपलब्ध नाहींत. सासरपे येथें सुरू करण्यांत यावयाच्या निर्भेळ, स्वावलंबी, अभिनव शिक्षण संस्थेच्या व आदर्श ग्रामोद्धार केंद्राच्या मदतीसाठी चालकांनीं हिंद मासिक काढलेलें आहे. मासिकाची वृत्ति निकोप राष्ट्रवादी असल्यामुळें प्रचलित राष्ट्रीय सरकारला तर मासिकाचा पाठिंबा आहेच, परंतु हिंदुमहासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व समाजवादी वगैरे पक्ष यांच्यांतील स्पृहणीय गोष्टी व माननीय व्यक्ती यांचा पक्षनिरपेक्ष बुद्धीनें योग्य तो परामर्शहि हिंद मासिकांत घेतला जातो, हा ह्या मासिकाचा विशेष आहे. प्रस्तुतच्या लघुकथा–स्पर्धा अंकांत निवडक गोष्टी प्रसिद्ध करण्यांत आल्या आहेत. उत्तान-शृंगारिक गोष्टी कटाक्षानें वगळण्यांत आल्या असल्या तरीहि प्रसिद्ध झालेल्या गोष्टी चांगल्या मनोरंजक आहेत व गोष्टींतील विषयांमध्यें विविधता असूनहि सर्व गोष्टींचे विषय समाजाच्या जिव्हाळ्याचेच आहेत. बक्षिस मिळालेल्या गोष्टींचा ह्या दृष्टीनें परामर्श घेणें बावगें होणार नाहीं. 'शुभस्य शीघ्रं' ह्या गोष्टींत संसारांत पतिपत्नीमध्यें समजुतदारपणा कसा आवश्यक आहे तें प्रतीत झालेलें आहे. परंतु हा दोष प्रौढ विवाहामुळें आला, असें योग्य परिपोष न करताच एका फालतू वाक्यांत लिहिलें आहे. तें योग्य दिसत नाहीं. 'दाढीवाला देशभक्त' व 'प्रेम आणि व्यवहार' ह्या दोन्ही गोष्टी कांहीं अंशीं अतिरंजित असल्या तरी बोधप्रद आहेत. 'साधं सरळ मन' ह्या प्रकारच्या अनेक गोष्टी आतां समाजाच्या पुढें जरूर ठेवल्या गेल्या पाहिजेत, परंतु लांच घेणें टळावे म्हणून नोकरीचा राजीनामा देण्यापर्यंत पाळी न्यावी हें व्यवहार्य वाटत नाहीं. 'दक्षिणेचें दान' ही ह्याच विषयावरील गोष्ट त्या मानानें उजवी ठरते. 'रांया एकदांचा ये रे' ही गोष्ट इतिहासकालीन आहे. पेशवेकालीन सरदारपुत्रांच्या आकांक्षा त्या गोष्टीमध्यें प्रतीत होत आहेत. 'सुकलेला बगीचा' ही गोष्ट करुणरम्य आहे, परंतु तेवढ्याकरितां सुनबाईला मुद्दाम विजातीय ठरविण्याचें मात्र कांहींच कारण नव्हते. असो, एकंदरींत सर्व गोष्टी नवोदित हिंदराष्ट्राच्या समाजभावनांना योग्य वळण लावण्यास हातभार देतील अशाच असल्यामुळें हिंद मासिकाचा हा विशेषांक स्वागतार्ह झाला आहे हें निस्संशय !

स. वा. दातार.

**बँकांना ताकीद**—कांहीं बँका व त्यांचे नोकर ह्यांचेमधील वांधे इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलपुढें विचारासाठी आहेत. ट्रायब्यूनलच्या संमतीशिवाय अशा बँकांनीं कोणत्याहि नोकरास नोकरीवरून कमी करूं नये, अशी ताकीद हिंदुस्थान सरकारनें बँकांना दिली आहे.

**५० रु. वाली नॅ. सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें**—पांच व सात वर्षें मुदतीचीं नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें ५, १०, १००, १,००० व ५,००० रुपयांच्या कागदाचीं मिळत असत. आतां ५० रुपयांचे कागदहि मिळूं शकतील. १२ वर्षें मुदतीच्या सर्टिफिकेटांचे ५० रुपयेवाले कागद पूर्वीपासूनच मिळत आहेत.

## माळा, गोपीचंदन व जानवी करण्यासाठी सहकारी सोसायटी

ता. १–८–४९ रोजीं रात्रौ ९–३० वाजतां समस्त काशी कापडे यांचे मठांत वारकरी वस्तु उत्पादक सहकारी सोसायटी लि., पंढरपूरची विशेष साधारण सभा भरली होती. सदर प्रसंगीं दि सोलापूर डि. सेंट्रल को. बँकेचे सीनिअर इन्स्पेक्टर मे. भंडारेसाहेब व बँक इन्स्पेक्टरसो. मे. साळुंखे यांनीं सहकारी चळवळीचा इतिहास सांगून आजच्या परिस्थितींत सहकारी संस्थांची काय आवश्यकता आहे व उत्पादक सोसायट्यांनीं आपला कारभार कसा चालवावा याबद्दल माहिती दिली.

सदर सोसायटी पंढरपूर येथील काशी कापडे लोकांनीं स्थापन केलेली असून सोसायटीमार्फत वारकरी लोकांना लागणाऱ्या माळा, गोपीचंदन, जानवी या वस्तूंचें उत्पादन करण्यांत येते. अशा प्रकारची ही पहिलीच सोसायटी आहे. सदर सभेस १५० चे वर काशी कापडे लोक उपस्थित होते.

---

**टाटा ऑइल मिल्स कं. लि.**—वरील कंपनीनें ३१ मार्च १९४९ अखेर संपलेल्या वर्षी ३,४५,२८,६५४ रुपयांच्या मालाची विक्री केली. त्यापूर्वीच्या वर्षाच्या मानानें विक्रीचा आकडा सुमारें १ कोटी, १२ लक्ष रुपयांनीं वाढला आहे. ग्लिसरीनचा खप अधिक झाला आहे. यू-डि-कलोन वरील १८०% एक्साइझ पट्टीमुळें त्याचा खप उतरला आहे. कंपनीच्या खेळत्या भांडवलावर कच्च्या मालाच्या वाढत्या किंमतीमुळें जरा ताण पडून, कंपनीनें तारणावर घेतलेलें कर्ज ३२३⁄४ लक्ष रुपयांवरून ५४३⁄४ लक्ष रुपयांवर गेलें आहे. विक्रींत ४८% वाढ झाली तरी ठोक नफ्यांत २७% वाढ दिसते. उठावाच्या अभावीं, कित्येक साबण कारखानदारांकडे तयार माल पडून राहूं लागला आहे.

**मुंबई सरकारचें कर्ज**—मुंबई सरकारनें ३% १९६२ च्या कर्जासाठी अर्ज मागविले होते. पुरेसे अर्ज आले नाहींत, परंतु अंडररायटर्सनीं कराराप्रमाणें बाकीच्या रकमेचा भरणा केल्यावर सरकारला हवी होती तेवढी रक्कम मिळाली.

---


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या फक्त सभासदांकरितां.

# नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडची विशेष साधारण सभा रविवार दिनांक २८ ऑगष्ट १९४९ रोजीं दुपारीं ३ वाजतां पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मुख्य दिवाणखान्यांत भरणार आहे. सदर सभेंत मागील सभांचे वृत्तान्त कायम करणें, पोट नियमांच्या दुरुस्त्यांचा विचार करणें, सेव्हिंग्ज बँकेच्या नियमांत व नोकरी बाबतच्या नियमांत केलेल्या दुरुस्त्यांची माहिती घेणें, डायरेक्टरांच्या निवडणुकीच्या दुरुस्त्यांचा विचार करणें व ऐनवेळीं सभेपुढें येणाऱ्या इतर विषयांचा मे. अध्यक्षांच्या परवानगीनें विचार करणें, वगैरे कामें होतील. तरी सदर सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंति आहे.

पुणें, तारीख १-८-१९४९.

बोर्डाचे हुकुमावरून
द. दि. चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## मॅनेजिंग एजन्सी पद्धत बंद करा

### बॉंबे शेअर होल्डर्स असोसिएशनच्या सूचना

(१) नवीन मॅनेजिंग एजन्सीजना परवानगी असूं नये.

(२) जुन्या कंपन्यांत नव्यानें सुरू केलेल्या मॅनेजिंग एजन्सीज व २० वर्षें ज्यांचीं पुरीं झालीं आहेत अशा मॅनेजिंग एजन्सीज, हीं नवा कंपनी कायदा अंमलांत आल्यावर एका वर्षाचे आंत रद्द करावींत.

(३) मॅनेजिंग एजंट किंवा त्यांचे भागीदार ह्यांस शिक्षा झाली, कीं मॅनेजिंग एजंटांना जागा खालीं करण्याची सक्ति व्हावी. (सध्याच्या ८७ ब ह्या कलमाप्रमाणें, कंपनी साधारण सभेंत ठराव करून मॅनेजिंग एजंटांस काढूं शकते.) एका मॅनेजिंग एजन्सीचे जागीं दुसरी मॅनेजिंग एजन्सी येण्यास मध्यवर्ती सरकारची संमति आवश्यक असावी.

(४) कंपनी गुंडाळण्यांत आली, तर मॅनेजिंग एजंटांना नुकसानभरपाई मिळूं नये.

(५) मॅनेजिंग एजन्सीचें कमिशन नफ्याच्या ७½% पेक्षा अधिक असूं नये.

(६) मॅनेजिंग एजंटांना कंपनीकडून अप्रत्यक्ष रीतीनें पैसे उसने घेतां येऊं नयेत; मॅनेजिंग एजंटांचे बोर्डावरील प्रतिनिधी कमी करावेत. डिफर्डसारख्या, मॅनेजिंग एजंटांना भरमसाट मताधिकार देणाऱ्या शेअर्सवर नियंत्रण असावें.

---

### औद्योगिक उत्पादनांत वाढ

हिंद सरकारच्या उद्योग आणि पुरवठा खात्याच्या आकड्यांप्रमाणें, १९४९ च्या पहिल्या सहामाहींत हिंदुस्थानांतील औद्योगिक उत्पादन गेल्या सालच्या पहिल्या सहामाहीपेक्षा वाढलें आहे. फक्त कांहीं दुय्यम दर्जाचे उद्योगधंदे वरील विधानाला अपवाद आहेत. कापडाचें उत्पादन ११ कोटी वारानें घटलें आहे. १९४८ व १९४९ सालांतील पहिल्या सहामाहींतील उत्पादनाचे कांहीं तौलनिक आकडे खालीं दिले आहेत.

| | १९४८ | १९४९ |
|---|---|---|
| कोळसा (टन) | १५,५२,८७६ | ५,१५,४६,०६९ |
| पोलाद („) | ४,२६,३०० | ४,४२,९४३ |
| सिमेंट („) | ७,५०,२९० | ९,५८,०५१ |
| कागद („) | ४७,४४८ | ५१,३२४ |
| कापड (वार) | २,७०,६६,७८,८०० | १,९९,६६,०२,००० |
| सूत (पौंड) | ६९,०६,१६,००० | ७६,३४,०५,२०० |

---

### आयातीवर नियंत्रण

हिंदुस्थान सरकारनें कित्येक जिन्नस ओपन जनरल लायसेन्सच्या यादींतून आतां काढून टाकले आहेत. लायसेन्स पद्धतीनें त्यांची नियंत्रित आयात अर्थातच चालू राहील. कित्येकांनीं मोठ्या प्रमाणावर माल मागविला होता, परंतु त्याची विक्री होत नव्हती. अशा लोकांना सरकारचें, हुंडणावळ वांचविण्याचें हें धोरण, फारच पसंत पडलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. सुमारें ६० कोटी रुपयांची परराष्ट्रीय हुंडणावळ लागत असे अशा १६ जिनसांचें ओ. ज. लायसेन्समधून नांव आतां वगळलें आहे, परंतु किती रकमेपर्यंत आयातीस परवानगी मिळेल हें अद्याप जाहिर झालेलें नाहीं.













## सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँक लि.

सोलापूर शहरांतील व जिल्ह्यांतील ग्रामीण भागांतील घरगुती धंदे करणारे व उत्पादक सहकारी पद्धतीनें धंदा करणाऱ्या संस्था व व्यक्ति यांना आजपर्यंत धंद्याच्या उत्पादनासाठीं कर्ज मिळण्याची फारशी व्यवस्था नव्हती व असे धंदा करणारे कारागीर म्हणजे विणकर, सुतार, तेली, लोहार, ढोर, चांभार, मांग व इतर धंदे करणारे लोक यांना धंद्याशिवाय बाजारांत दुसरी पत नाहीं. त्यामुळें बाहेरून जबर व्याजानें कर्ज काढावें लागत असे. हल्लीच्या सरकारचें धोरण मजूर, कारागिर व शेतकरी यांच्या धंद्याला उत्तेजन देण्याचें असल्यामुळें धंदेवाईक लोकांना पैशाचा पुरवठा करण्याचे दृष्टीनें व त्यांना लागणारा माल खरेदी–विक्री किफायतशीर करून देणेच्या दृष्टीनें कारागीर लोकांसाठीं स्वतंत्र बँकेची जरूरी होती आणि ही उणीव मुंबई प्रांतांतील इतर कोणत्याहि जिल्ह्यापेक्षां सोलापूरनें प्रथम भरून काढली आहे.


ता. ३०–३–४९ चैत्र शुा १ पाडव्याचे सुमुहूर्तावर सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँक स्थापन झाली आहे. बँकेच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरवात आगस्ट १९४९ च्या दुसऱ्या आठवड्यापासून होणार आहे.

**बँकेचा उद्देशः**—सोलापूर शहरांतील व जिल्ह्यांतील धंदेवाईक लोकांना कर्ज पुरविणें, मालाचे तारणावर कर्ज देणें, मालाची किफायतशीर दरानें खरेदी–विक्री करून देणें, धंदेवाइकांच्या अडचणींचा विचार करून त्या दूर करणेचा प्रयत्न करणें व त्यांना धंद्याच्या दृष्टीनें लागणारी मदत व सोय करवून देणें. तसेंच जिल्ह्यांतील ज्या धंदेवाईक सामुदाइक पद्धतीनें काम करणाऱ्या सहकारी संस्था असतील त्यांना वरीलप्रमाणें मदत करणें.

**भांडवलः**—बँकेनें एकूण कर्ज, ठेवी, शेअर या रूपानें जमवावयाचें भांडवल रु. १०,००,००० दहा लाख रुपयांचें आहे. त्यापैकीं शेअर रूपानें गोळा करावयाचें भांडवल २,००,००० दोन लाख रुपये असून रु.५०चा एक शेअर या प्रमाणांत भांडवल जमा करण्याचें काम हल्लीं सुरू असून आतांपर्यंत रु. ५०,००० चे वर शेअर खपले आहेत. सोलापूर जिल्ह्यांतील औद्योगिक सोसायट्यांसाठीं व व्यक्तिशः धंदेवाईक लोकांसाठीं रु. ५०,००० शेअर भांडवल राखून ठेविलें आहे.

**बँक डायरेक्टर्सः**—बँकेचे एकूण १५ डायरेक्टर्स असून, त्यापैकीं भागीदारांतर्फे ६, सहकारी संस्थांतर्फे ५ आणि निरनिराळ्या संस्थांचे व सरकारी नॉमिनेटेड ४ आहेत. पहिलीं ३ वर्षें निवडणूक साधारण सभेंतून व्हावयाची नसून, मे. जॉईंट रजिष्ट्रारसाहेब हे पहिले ३ वर्षांचें सर्व बोर्ड ऑफ डायरेक्टर्स नॉमिनेट करणार आहेत.

बँक–शेअर विक्रीसाठीं शेअर गोळा करणारे मंडळाची निवड झाली असून त्याचेमार्फत श्री. एम. आर. पुळी माजी प्रेसिडेंट सोलापूर म्यु. व चेअरमन शेअर कलेक्शन कमेटी, श्री. गुडा, मॅनेजर सोलापूर डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रियल असोसिएशन, मि. अवचट, सुपरवायझर इं. को. अँन्ड व्हि. इंडस्ट्रीज सोलापूर यांचेमार्फत हें काम सुरू आहे.




## आगबोट वहातुकीमधील प्रगति मंदावली

### सरकार–पुरस्कृत शिपिंग कॉर्पोरेशन्स

गेल्या वर्षी हिंदुस्थान सरकारनें तीन मोठ्या शिपिंग कॉर्पोरेशनच्या स्थापनेची घोषणा केली होती. परंतु, आगबोट वहातुकीचा अनुभव असलेल्या व पुरेसें भांडवल उभारूं शकतील अशा मॅनेजिंग एजंटांचे अभावीं सरकारी योजनेची प्रगति खुंटली आहे. एका कॉर्पोरेशनच्या मॅनेजिंग एजन्सीसाठीं सिंधा स्टीम नॅव्हिगेशन कंपनीचें नांव पुढें आहे; ह्या कॉर्पोरेशनकडे हिंदुस्थान–तांबडा समुद्र, इजिप्त, चीन, जपान व ऑस्ट्रेलिया मार्गावरील वहातूक सोपविली जाईल.

प्रत्येक कॉर्पोरेशनच्या भांडवलापैकीं ५१% भांडवल सरकार घालील, मॅनेजिंग एजंटांनीं २६% घालावयाचें व २३% लोकांनीं द्यावयाचें, अशी योजना आहे. लोकांनीं आपला वाटा उचलला नाहीं, तर सरकार त्याची भरपाई करील.

सरकार प्रत्येक कॉर्पोरेशनसाठीं सहा आगबोटी विकत घेऊन देणार होतें. दोन आगबोटींची खरेदी झाली आहे. परंतु डॉलरचा तुटवडा व पैशाची तंगी ह्यामुळें पुढें प्रगति होऊं शकली नाहीं. विकत घेतलेल्या दोन बोटी तूर्त ऑस्ट्रेलियाकडे सिंधा कंपनीमार्फत मालाची ने–आण करीत असतात.

### दि हिंद एजन्सी लिमिटेड, कोल्हापूर

दि हिन्द एजन्सी लि. कोल्हापूरची द्वितीय वार्षिक सभा शनिवार ता. ३०-७-१९४९ इ. रोजीं कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसांत भरली होती. कंपनीनें साडेबारा टक्के नफा वाटला असून स्टाफला एक महिन्याचा बोनस दिला आहे. कंपनीस स्थिरता आणण्याच्या दृष्टीनें सर्व प्रकारच्या तरतुदी करण्यांत आल्या आहेत. कंपनीनें आपल्या पहिल्या वर्षाच्या कारकीर्दींत सुमारें तीन लाखांची मशिनरी मुख्यतः ऑईल इंजिन्स, पंप, चक्क्या, राइस हॉलर्स, तेलघाणे, इलेक्ट्रिक मोटारी, डायनामो, शेती आयुधें, वर्कशॉप मशिन टूल्स, टाइप रायटर्स, तिजोऱ्या, लोखंडी कपाटें इत्यादि अनेक प्रकारचीं यंत्रें व यांत्रिक सामुग्री पुरविली होती, तर ती दुसऱ्या वर्षी सुमारे पांच लाखांची पुरविली आहे. कंपनीनें आपल्या कार्याचें व्याप सर्व हिंदुस्थानभर वाढविले असून मद्रास ते लुधियाना या सर्व भागांत अनेक ठिकाणीं यांत्रिक पुरवठा केला आहे. लहानसहान भांडवलावर स्वतंत्र उद्योगधंदे सुरू करूं इच्छिणाऱ्या अनेक व्यक्तींना व संस्थांना कंपनीनें सर्व प्रकारचें सहाय्य व मार्गदर्शन आत्मीयतेनें केलें आहे.

### दि पूना मर्चंटस को. बँक लि.

बँकेचें वसूल भांडवल १९४८–४९ अखेर ९,२०० रु. नीं वाढून तें १,१४,४६० रु. झालें. सभासदसंख्या वाढत चालली आहे. व्यवहारांतील रोख पैसा कमी होऊं लागला असला तरी बँकेच्या खेळत्या भांडवलांत फारसा फरक आढळून येत नाहीं. ५,९९८ रु. नफ्यापैकीं ३॥% डिव्हिडंडसाठीं ४,००० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. (चेअरमनः श्री. ना. सं. जमदाडे. एजंटः श्री. भ. ग. सावणे.)

## सारस्वत
### को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
[ स्थापना १९१८ ]



सारस्वत बँक बिल्डिंग, मुंबई ४ टे. नं. ३१६७५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ४,२५,००० |
| रिझर्व्ह | ... | रु. २,६५,००० |
| ठेवी | ... | रु. ८८,५२,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. ९६,५२,००० |

बचतीच्या आकर्षक योजना

सब-ऑफिस :
—दादर—
( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

वा. पुं. वर्दे,
बी. कॉम्.,
अध्यक्ष.

शं. वि. संझगिरी,
बी. कॉम्.,
सेक्रेटरी.

बेळगांव शाखा : मार्केट, बेळगाव



## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. २४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

**मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर**

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर



## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी:— ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई
( मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वये नोंदलेली )

स्थापन साल १९११

चेअरमन:-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| भागांचें भांडवल | रु. | २०,३९,२०० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. | २७,२१,००० |
| ठेवी | रु. | ७,८९,७४,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ८,९७,३७,००० |

प्रांतांतील दहा जिल्ह्यांमध्यें ५१ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तीबद्दल मुख्य कचेरी-कडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.



## दि रत्नाकर बँक, लि.
( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

**शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.**

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ४१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४३,००,००० |

*—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—*

श्री. बी. बी. पाटील,
B. A., LL. B., वकील
सांगली
चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले,
M. L. A.,
कोल्हापूर,
व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा,
B. Com., C. A. I. I. B,
मॅनेजर


हें पत्र पुणें, पेट भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.